जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र, भंडारा

दुरध्वनी क्र... : 07184 – 257872 (कार्यालय)
Fax.No. : 07184 – 257872
E-mail :dtomhbnd@rntcp.org

जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, सामान्य रुग्णालय परिसर भंडारा
जा.क्र. जिक्षअजिक्षकेंभ/NTCP-society/Private X-ray/310/२३
दिनांक :- 05/06/2023

District Integrated Health and Family Welfare Society- NTEP Bhandara

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
जिल्हा भंडारा.

**विषय** :- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांचे एक्स रे काढण्याकरीता खाजगी रेडीओलॉजिस्ट यांचेकडून अर्ज मागविण्याकरीता जाहिरात जिल्हा शासकीय संकेत स्थळावर प्रकाशित करण्याबाबत.

मा. महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांचे एक्स रे काढण्याकरीता खाजगी रेडीओलॉजिस्ट यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहे.तरी सदर जाहिरात जिल्हा शासकीय वेबसाईट https://bhandara.gov.in वर प्रकाशित करण्याचे प्रस्तावित आहे. करीता आपणास सविनय विनंती करण्यात येते कि,सदर पदभरती जाहिरात उमेदवारांच्या माहिती करीता भंडारा जिल्हा शासकीय वेबसाईट https://bhandara.gov.in वर प्रकाशित करण्याची परवानगी देण्यात यावी.

जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र भंडारा.

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर :-
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान भंडारा**

**जाहीरात**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत क्षयरुग्णांचे एक्स रे काढण्याकरीता खाजगी रेडीओलॉजिस्ट यांचेकडून विहीत नमुन्यात दि.14/6/23पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. याबाबत सविस्तर माहीती www.bhandara.org.inव https://bhandara.gov.inया संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र, भंडारा

—सही—
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,भंडारा

# अर्जाचा नमुना

**जिल्हा क्षयरोग अधिकारी जिल्हा क्षयरोग केंद्र, भंडारा.**

**क्ष-किरण तपासणी करीता संमती पत्र**

**प्रति,**

**जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र, भंडारा.**

१. खाजगी **क्ष-किरण** वैद्यकिय अधिकाऱ्यांचे नाव :- ..................................

२. पत्रव्यवहाराचासंपूर्णपत्ता :- ..........................................

३. दूरध्वनी/भ्रमणध्वनीक्रमांक :- ..........................................

४. (कायमसुरुअसलेलाक्रमांक) :- ..........................................

५. ईमेलआयडी (अनिवार्य) :- ..........................................

६. नोंदणी क्र. :-............

मी, असे प्रमाणित करतो/करते की, आपले कार्यालयातील **क्ष-किरण तपासणी करीता** दर ..... /-प्रति क्ष -किरण काढण्याकरीता मला मान्य आहेत. तरी उपरोक्त प्रमाणे शासकिय यंत्रणेस वरील दरात क्ष-किरण काढण्याकरीता मला संधी देण्यात यावे.

ठिकाण :- .....................  डॉक्टरांचे पुर्ण नाव :-..............................

दिनांक :- .....................

## अटी व शर्ती

१. **NTEP** अंतर्गत भंडारा जिल्हयातील क्षयरुग्णांची विना मोबदला क्ष-किरण तपासणी क्षयरोग निदान होई पर्यंत करण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर कालावधीत रुग्णाची **NTEP** अंतर्गत मोफत क्ष-किरण तपासणी करण्यात येणार नाही.

२. **NTEP** अंतर्गत मोफत क्ष-किरण तपासणी करिता देण्यात आलेल्या संदर्भीय पत्राचा नमुना व्यतिरिक्त दुसऱ्या प्रपत्रात संदर्भीय पत्र ग्राहय धरल्या जाणार नाही. संदर्भिय पत्रावर नमुद दिनांकाच्या १० दिवसानंतर सदर संदर्भिय पत्र गृहीत धरल्या जाणार नाही.

३. उप.जि.रु./ग्रा.रुग्णालय व प्रा.आ. केंद्रातून संदर्भीत केलेल्या रुग्णांची क्ष-किरण तपासणी केल्यानंतरच मोबदला देय राहील.

४. खाजगी रेडिओलॉजिस्ट यांनी १) वैद्यकिय अधिकारी/ CHO यांनी संदर्भीत केलेले मुळपत्र, २) एक्स रे रिपोर्टची प्रत ३) रजिस्टर/रेकॉर्ड बुक ची प्रत ४) एक्स रे चे देयके (Bill) जिल्हा क्षयरोग अधिकारी,जिल्हा क्षयरोग केंद्रं,भंडारा यांच्याकडे सादर केल्यावरच देयके अदा करण्यात येईल.

५. **NTEP** कायदयाची तंतोतंत अंमलबजावनी करणे बंधनकारक राहील. यामध्ये काही गुंतागुंत झाल्यास त्याबदद्ल सर्वस्वी खाजगी रेडिओलॉजिस्ट जबाबदार राहतील.

६.आवश्यक विविध फार्म/ रजिस्टर/ रेकॉर्ड /संदर्भीय मूळपत्र ठेवण्याची जबाबदारी खाजगी रेडिओलॉजिस्ट यांची राहील.

७. एक्स रे अहवाल विनाविलंब संबंधित लाभार्थीमार्फत वैद्यकिय अधिकारी यांना सादर करण्यात येईल.

८. काही त्रृटी आढळल्यास किंवा अडचण निर्माण झाल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने यामध्ये अंशतः बदल करण्यात येईल.

९. राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरावरील संशयित क्षयरुग्णांचे क्ष-किरण काढुन अहवाल सादर करणे या करीता खाजगी रेडिओलॉजिस्ट यांना क्ष-किरण तपासणी करिता रु.३४५/- प्रति क्षयरुग्ण दिनांक .................. ते ३१/०३/२०२४ पर्यंत करार पध्दतीने नेमणुक करण्यात येत आहे.

दिनांक :- ..................